पुढारी

# डॉ. विजय कुंभार यांची नवोपक्रम परिषदेसाठी निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



डॉ. विजय कुंभार

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे वरिष्ठ सहयोगी संशोधक डॉ. विजय कुंभार यांची भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग तसेच प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालयामार्फत आयोजित 'उदयोन्मुख विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम परिषदे'साठी (२०२५) 'युवा विज्ञान आणि तंत्रज्ञान लीडर' म्हणून निवड झाली आहे. ३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे ही राष्ट्रीय परिषद होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे.

ऊर्जा साठवणूक क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधनाच्या आधारे डॉ. कुंभार यांची परिषदेसाठी निवड करण्यात आली आहे. नवोपक्रम परिषदेच्या माध्यमातून कुंभार यांना 'विकसित भारत २०४७' च्या तांत्रिक रूपरेषेला आकार देण्यासाठी नोबेल पुरस्कार विजेते, जागतिक तज्ज्ञ आणि देशातील शीर्ष धोरणकर्त्यांशी संवाद साधण्याची अनोखी संधी लाभणार आहे. त्यांच्या यशाबद्दल प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ

## दृष्टिक्षेपात

# डॉ. विजय कुंभार यांची निवड


डॉ. विजय कुंभार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातील वरिष्ठ सहयोगी संशोधक डॉ. विजय कुंभार यांची भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग व प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालयातर्फे आयोजित उदयोन्मुख विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम परिषदेसाठी (२०२५) 'युवा विज्ञान आणि तंत्रज्ञान लीडर' म्हणून निवड झाली आहे. तीन ते पाच नोव्हेंबरदरम्यान नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे ही राष्ट्रीय परिषद होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. डॉ. कुंभार यांची ऊर्जा साठवणूक क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधनाच्या आधारे परिषदेसाठी निवड करण्यात आली आहे.

पुण्यनगरी

# डॉ. विजय कुंभार यांची 'नवोपक्रम'साठी निवड



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे वरिष्ठ सहयोगी संशोधक डॉ. विजय कुंभार यांची भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, तसेच प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालयामार्फत आयोजित उदयोन्मुख विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम परिषदेसाठी (२०२५) 'युवा विज्ञान आणि तंत्रज्ञान लीडर' म्हणून निवड झाली आहे. येत्या ३ ते ५ नोव्हेंबर दरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे ही राष्ट्रीय परिषद होणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. ऊर्जा साठवणूक क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधनाच्या आधारे डॉ. कुंभार यांची परिषदेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
0 2 NOV 2025
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापु


# पुरुषोत्तम करंडक स्पर्धेला प्रतिसाद

## तरुणाईकडून वर्तमानातील विविध प्रश्नांवर भाष्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी येथे रंगली असून, रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. वर्तमानातील विविध प्रश्नांवर तरुणाई स्पर्धेच्या माध्यमातून भाष्य करते आहे. महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), देवल क्लब, शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात स्पर्धा सुरु आहे. दरम्यान, स्पर्धेत आज अकरा एकांकिका सादर झाल्या. उद्या (रविवारी) सायंकाळी सहा वाजता पारितोषिक वितरण होणार आहे.

स्पर्धेत एकूण २६ संघांचा सहभाग आहे. आज सकाळच्या सत्रात न्यू कॉलेज (घरोंट), आजरा महाविद्यालय (आर या पार), भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय (एक डॉट), शहाजी लॉ कॉलेज (अर्थाच्या शोधात), कॉमर्स कॉलेज (ग्वाही) या संघांच्या एकांकिका सादर झाल्या. सायंकाळच्या सत्रात डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (इ दिनगुलिओ केते जाबे), बुधगावच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट (स्काय वॉक), सांगलीच्या चिंतामणराव व्यापार महाविद्यालय (अव्यक्त), डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग (मिठाई), इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम कॉलेज (कुपन), शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग (अ युजलेस जिनीअस) या संघांनी एकांकिका सादर केल्या. दरम्यान, उद्या (रविवारी) सकाळच्या सत्रात चार एकांकिका सादर होतील.



कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत शनिवारी सादर झालेल्या एकांकिकेतील एक प्रसंग.